# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-09.04.2026** **वार- गुरुवार**

---

**बारामती निवडणूक**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेण्याचे आदेश काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिले आहेत. दिवंगत अजित पवार यांच्याप्रती आदर दर्शवण्यासाठी काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतल्याचं चेन्निथला यांनी वार्ताहरांना सांगितलं. या निर्णयानुसार कॉंग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली. भाजपाच्या विचारधारेला विरोध म्हणून काँग्रेसनं बारामती मतदारंघात उमेदवार दिला होता. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध नेत्यांनी काँग्रेसच्या नेत्यांशी संपर्क साधून निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती केली, त्यामुळे सामंजस्य आणि संवादाची भूमिका घेत पक्षानं उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचं सपकाळ यांनी सांगितलं. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन केला होता, मात्र या निर्णयाशी त्याचा काहीही संबंध नाही. अजित पवार यांनी भाजपाशी युती करण्याचा निर्णय घेतला; त्या निर्णयाला आपला विरोध कायम राहील. त्यांच्यासारख्या मोठ्या नेत्याच्या अपघाती मृत्यूनंतर साधा गुन्हाही महाराष्ट्रात दाखल होत नाही, हे दुर्दैवी असल्याचं सपकाळ म्हणाले. दोन्ही राष्ट्रवादींच्या नेत्यांनी केलेल्या भावनिक आवाहनाला प्रतिसाद देत राज्यातल्या सर्व ज्येष्ठ नेत्यांशी चर्चा करून निवडणुकीतून मागे हटत असल्याचं सपकाळ म्हणाले. खरी लढाई ही 2029मध्ये होईल आणि त्यावेळी बारामतीतून काँग्रेसचा आमदार निवडून येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या पोटनिवडणुकीसाठी 23 एप्रिल रोजी मतदान होणार असून 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**खासदार शपथ**

राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ अजित पवार यांना आज उपराष्ट्रपती तसंच राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी निवडून आलेल्या पार्थ पवार यांचा शपथविधी संसद भवनातल्या अध्यक्षांच्या परिषद कक्षात झाला.

**पुणे-पाणी पुरवठा**

पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानं दर महिन्याच्या पाणीपुरवठ्यात 15 टक्क्यांनी कपात करावी, अशी सूचना जलसंपदा विभागाने केली आहे. यंदा पावसाचं प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेऊन, तो 31 जुलैपर्यंत कशा प्रकारे पुरविता येईल, याचं नियोजन करणे आवश्यक आहे. त्या पार्श्वभूमीवर ही सूचना करण्यात आली आहे.

**उड्डाण पूल**

पुण्यातील साखर संकुल ते जुना मुंबई-पुणे रस्ता या दरम्यान उड्डाण पूल उभारण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. त्यामुळे कृषी महाविद्यालय ते संचेती रुग्णालय या दरम्यान होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पासाठी 61 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**अनधिकृत तारा**

पुणे शहरातील अनधिकृत केबल्स संदर्भात कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी समिती स्थापन केली आहे. अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये प्रशासकीय अधिकारी आणि इंटरनेट तसंच मोबाइल सेवा पुरवठादारांच्या प्रतिनिधींचा आणि सल्लागारांचा समावेश आहे. शहरातील हजारो अनधिकृत केबल्समुळे नागरिकांचा अपघात होण्याचीही भीती असून महापालिकेचे हजारो कोटींचे उत्पन्नही बुडत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने अनधिकृत ओव्हरहेड केबल तोडण्याची कारवाई सुरू केली आहे. मात्र, या निर्णयामुळे केबल आणि इंटरनेट पुरवठादारांमध्ये अस्वस्थता असून, आधी धोरण निश्चित करण्याची मागणी त्यांच्याकडून केली जात आहे.

**एमएनजीएल**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे राज्यात व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला होता; त्यानंतर पुणे आणि परिसरातील हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिकांनी 'एमएनजीएल'ची जोडणी घेण्यासाठी प्राधान्य दिलं आहे. त्यानुसार 'एमएनजीएल'ने अलीकडच्या काही दिवसांमध्ये 40हून अधिक नवीन रेस्टॉरंटना नवीन जोडणी दिली आहे. आत्तापर्यंत एमएनजीएलने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये 2500 किलोमीटरचं जाळं उभारलं आहे. वापर वाढविण्यासाठी कंपनी घरोघरी जाऊन जनजागृती मोहीम राबवणार असल्याची माहिती ‘एमएनजीएल’च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**स्वरानंद**

मराठी सुगम संगीताचे रंगमंचीय कार्यक्रम करणाऱ्या; पुण्यातील 'स्वरानंद प्रतिष्ठान' या संस्थेच्या स्थापनेला 50 वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे. स्वरानंदच्या या स्वरमयी प्रवासाचं वर्णन असलेल्या 'सुवर्णमहोत्सवी स्वरानंद' या पुस्तकाचं प्रकाशन पुण्यात नुकतंच झालं. प्रतिष्ठानचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश भोंडे यांनी हा प्रवास पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी आणि प्रशांत दामले यांच्या हस्ते पुस्तकाचं प्रकाशन झालं. स्वरानंदचा प्रवास हा मराठी सांस्कृतिक इतिहासाचा महत्वाचा टप्पा असल्याचं प्रतिपादन विजय कुवळेकर यांनी यावेळी केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल 35 तर किमान 21 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**